महाराष्ट्र शासन -कृषी विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/२ ई-मेल :-mahapocra@gmail.com

जा क्र. नादेकृसंप्र-१०१८ /प्र.क्र.१४२ /जमीन आ.गांडूळ,नाडेप,सेंद्रीय युनिट / ३६३ दि. ०१.१०.२०१८

**प्रति,**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**
**(प्रकल्पातील सर्व जिल्हे)**

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत जमीन आरोग्य सुधारणे या घटकाअंतर्गत गांडूळ खत उत्पादन युनिट, नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट बाबतच्या मार्गदर्शक सूचना सन २०१८-१९**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत जमीन आरोग्य सुधारणे या घटकाअंतर्गत गांडूळ खत उत्पादन युनिट, नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट ( अ २ (६) (i)) व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट ( अ २ (६) (ii)) या मंजूर बाबी राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना सहपत्रित करण्यात येत आहेत.

**सोबत :-** वरीलप्रमाणे

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत- माहितीस्तव सादर**

१. सचिव, कृषि व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई

**प्रत - माहिती व पुढील कार्यावाहीस्तव अग्रेषित**

१. आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
२. प्रकल्प संचालक, आत्मा (प्रकल्पांतर्गत सर्व)
३. उप विभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पांतर्गत सर्व)

# जमीन आरोग्य सुधारणे
# गांडूळ खत उत्पादन युनिट आणि नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट

(अ २ (६) (i)) व (अ २ (६) (ii))

**<u>प्रस्तावना:</u>**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनामार्फत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

सेंद्रीय शेती पद्धतीमध्ये निसर्ग संवर्धन करणे, पिक उत्पादनाचा खर्च कमी करणे, रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके व संप्रेरके या सारख्या घातक रसायनांना पर्यायी अशा सेंद्रिय व जैविक निविष्ठाचा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. गांडूळ खत किंवा व्हर्मी कंपोस्ट हे शेतातील काडी कचरा, वनस्पतीजन्य पदार्थ, शेण यांचेपासून गांडूळांद्वारे बनविले जाते. गांडूळ खतामध्ये विविध जिवाणू, संजिवके, व्हीटॅमिन आणि इतर उपयुक्त रसायने गांडूळ खतामध्ये असल्याने त्याचा पिकाच्या वाढीवर चांगला परिणाम होतो.

याच बरोबर शेतातील कचऱ्यावर कंपोस्टिंगव्दारा प्रक्रिया केल्यास त्यातील सेंद्रिय पदार्थ जैविक पध्दतीने, सूक्ष्म जीव तसेच गांडुळांव्दारे कुजून त्यापासून उत्तम प्रकारचे ह्युमस सारखे सेंद्रिय कंपोस्ट खत तयार होते. या खताचा वापर शेतात मोठया प्रमाणात केला गेल्यास, जमिनीचे आरोग्यात विशेष सुधारणा होऊन, कृषि उत्पादनात फार मोठी भर पडेल. शेतातून निघालेल्या सर्व वनस्पतीजन्य पदार्थांपासून सेंद्रिय खत तयार करून, परत शेतात टाकणे ही काळाची गरज आहे. सेंद्रिय खतामुळे जमिनीचा कस व जलधारणा शक्ती वाढून पोषक द्रव्यांचा पुरवठा योग्य प्रमाणात होतो. जमिन भूसभूशीत राहते. त्यामुळे जमिनीत हवा खेळती राहते. शेतात उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची वाढ होण्यास मदत होते.

या अनुषंगाने सदरची बाब विचारात घेऊन गांडूळ खत उत्पादन युनिट आणि नॅडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट हे वैयक्तिक लाभाचे घटक राबविणे प्रस्तावित आहे.

**<u>उद्दिष्टे:</u>**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गावसमुहातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. पौष्टिक अन्नधान्याचे उत्पादन करणे.
३. नैसर्गिक घटकांना हानी न पोहोचविता त्यांचा योग्य वापर करुन शेती करणे.
४. जमिनीची सुपिकता वाढविणे व ती दिर्घकाळ टिकविणे.

५. स्थानिक स्त्रोताचा पुर्नवापर शेतीमध्ये करणे.
६. शेतीचा उत्पादन खर्च कमी करुन शेतक-याच्या निव्वळ उत्पन्नात वाढ करणे.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावासाठीच्या ग्राम कृषी संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेले अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/ जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात यावा.
२. ज्या शेतकऱ्याकडे गांडूळ खत उत्पादन युनिट, नॅडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उभारण्याकरिता जागा उपलब्ध आहे अशा शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.
३. ज्या शेतकऱ्याकडे गांडूळ खत उत्पादन युनिट, नॅडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उभारल्यानंतर ते व्यवस्थित सुरु राहण्यासाठी किमान दोन जनावरे उपलब्ध आहेत, अशा शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.
४. या घटकाकरिता इतर कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना या योजने अंतर्गत पुन्हा लाभ देण्यात येवु नये.

**अर्थसहाय्य:**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या गांडूळ खत उत्पादन युनिट, नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट हे वैयक्तिक लाभाचे घटकासाठी अनुज्ञेय अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे;

| अ.क्र. | घटक | अपेक्षित किंमत (रु.) | अनुज्ञेय अनुदान (रु.) | तपशिल |
|---|---|---|---|---|
| अ. | गांडूळ खत उत्पादन युनिट/नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट | रुपये १०,०००/- | किंमतीच्या ५०%, जास्तीत जास्त रु. ५०००/- | **गांडुळ खत युनिट उभारणीः** पाण्याचा निचरा होणा-या हवेशीर जागेवर १० फुट X ३ फुट X २.५ फुट या आकारमानाचे बांधकाम करुन युनिटची उभारणी सावलीमध्ये करावी. **नॅडेप खत युनिट उभारणीः** पाण्याचा निचरा होणा-या हवेशीर जागेवर १० फुट X ६ फुट X ३ फुट तसेच भिंतीची जाडी ९ इंच, तसेच खेळती हवा रहाण्यासाठी ७ इंच आकारमानाचे झरोके चारही बाजुस, या आकारमानाचे बांधकाम करुन युनिटची उभारणी सावलीमध्ये करावी. |
| ब. | सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट | रुपये ६०००/- | किंमतीच्या ५०%, जास्तीत जास्त रु. ३०००/- | पारंपारिक पद्धतीने सेंद्रिय निविष्ठांची निर्मिती करणे. बिजामृत, जीवामृत, बायोडायनॅमिक, सी. पी. पी. इत्यादी सेंद्रिय निविष्ठांची निर्मिती करणे. |

**संदर्भ:** जा.क्र.कृआ/सेंशेयो/प्र.क्र. २०१८-१९/मासू/३८९, दिनांक १२ जुन २०१८ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.

सदर मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केल्यानूसार निश्चित केलेल्या तांत्रिक निकषांनुसार साहित्य असणे आवश्यक आहे.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-**

**लाभार्थी :-**

१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर समूह सहाय्यकाच्या मदतीने नोंदणी करावी व ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) कडे विहित नमुन्यात (प्रपत्र-१) आवश्यक कागदपत्रासहित अर्ज सादर करावा.
२. उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून पूर्वसंमत्ती पत्र मिळाल्यानंतर पूर्वसंमती पत्रासोबत दिलेल्या तांत्रिक निकषाप्रमाणे संपुर्ण प्रकल्पाची उभारणी प्रथम करणे बंधनकारक राहील.
३. लाभार्थ्याने गांडूळ खत उत्पादन युनिट, नॅडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उभारणीसाठी आवश्यक साहित्य सामुग्री उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम ) मिळणार नाही.
४. निवडलेल्या लाभार्थींना त्यांच्या पसंतीच्या बांधकाम व्यवसायिक अथवा स्वत: अथवा गवंडी यांचे मार्फत गांडुळ खत उत्पादन युनिट अथवा नॅडेप खत उत्पादन युनिटचे बांधकाम करुन घेण्याची मुभा राहणार आहे.
५. गांडुळ खत उत्पादन युनिट अथवा नॅडेप खत उत्पादन युनिटची उभारणी प्रकल्प स्थळी झाल्यानंतर संबंधीत कृषि सहाय्यक/समूह सहाय्यक यांना कळविणे.
६. देय अनुदान मिळणेसाठी मागणीपत्र (प्रपत्र-४) संबधित कृषी सहाय्यका मार्फत उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या नावे सादर करावे. सोबत आवश्यक बिले शेतकऱ्यांने स्वत:ची स्वाक्षरी करून सादर करणे आवश्यक आहे.

**ग्राम कृषी संजीवनी समिती (VCRMC) :-**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांचे घटकांतर्गत बाबीचा लाभ घेण्यासाठीचे विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करून घ्यावेत.
२. प्राप्त सर्व अर्ज व सादर केलेली कागदपत्रे कृषी सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांची, अनुसुचित जाती / जमाती, महिला शेतकरी, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करावी.
३. इच्छुक लाभार्थ्यांचे प्राप्त अर्जाच्या पात्र / अपात्रते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
४. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करावे.

**समूह सहाय्यक :-**

१. इच्छुक लाभार्थी शेतक-यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.

२. शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व शेतकऱ्यांने सादर केलेली कागदपत्रे कृषि सहाय्यक यांचे मदतीने छानणी करुन अर्जांची अत्यल्प व अल्प भूधारक अशी प्रवर्गनिहाय अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती / दिव्यांग / महिला शेतकरी / इतर सर्वसाधारण शेतकरी या प्राधान्यक्रमाने वर्गवारी करावी.
३. उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून प्राप्त पूर्वसंमती पत्रांच्या नोंदी ठेवणे. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगावेत.
४. प्रकल्प स्थळाचे भौगोलिक स्थानांकन (Geo Tagging) करण्यास कृषी सहाय्यक यांना मदत करावी. लाभार्थी व तपासणी अधिकारी यांचे समवेत अंमलबजावणी पूर्वी व अंमलबजावणी नंतर प्रकल्प स्थळाचे अक्षांश / रेखांश सह फोटो काढावेत. सदरचे फोटो प्रकल्पाच्या संगणक प्रणालीवर अपलोड करावेत. (स्थळ पाहणी व मोका तपासणीच्या वेळेस)

**कृषि सहाय्यक :-**

१. कागदपत्रांची छानणी करताना शेतकऱ्यांचे विहीत नमुन्यातील अर्ज, शेतकऱ्यांच्या मालकी हक्काचा ७/१२ उतारा, ८-अ, यापूर्वी इतर योजनेतून लाभ घेतलेला आहे काय, या बाबतचा तपशिल, प्राधिकृत अधिकाऱ्याचे संवर्ग प्रमाणपत्र (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती शेतकऱ्यांसाठी) आहे काय, इत्यादी सर्व अनुषंगीक बाबींची पडताळणी करावी.
२. पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची तसेच ८-अ मध्ये नमूद सर्व गट/सर्वे नं. मध्ये पाहणी करुन गांडूळ खत उत्पादन युनिट, नॅडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उभारणीसाठी निवड केलेली जागा योग्य आहे किंवा नाही याबाबत तपासणी करावी व तसा तपशील नमूद करावा आणि नियोजित प्रकल्प स्थळ व लाभार्थी सदर घटकासाठी पात्र आहे किंवा नाही याबाबत अहवाल सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात (प्रपत्र-३) उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.
३. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यास इतर योजनेतून शासकीय अनूदान घेतले असल्या/नसल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची खात्री करून ही बाब प्रकल्प मंजूरीसाठी सादर करताना उपविभागीय कृषि अधिकारी यांना अवगत करावी.
४. लाभार्थी गांडूळ खत उत्पादन युनिट, नॅडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिटचे बांधकाम प्रकल्प स्थळी पुर्ण झाल्याचे कळविल्यानंतर संबंधित कृषि सहाय्यक यांनी, केलेले बांधकाम मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे तांत्रिक दर्जाचे असल्याबाबत मोका तपासणी करावी. तांत्रिक व आर्थिक निकषाप्रमाणे देय होणा-या अनुदानाची गणना करून अनुदान अदायगीकरिता उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे शिफारस करणे.

   सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात (प्रपत्र-५) तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे. तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थीस द्यावी. तपासणी अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा.
५. या घटकाच्या प्रक्रियेस अनुसरून मध्यावधी आणि अंतिम मुल्यमापनास प्रकल्प यंत्रणेला मदत करणे.

**कृषी पर्यवेक्षक :-**

१. लाभार्थी /ग्राम कृषी संजीवनी समिती (VCRMC) / कृषी सहाय्यक/ समूह सहाय्यक यांनी अवगत केल्यानंतर अनुदान अदायगी पूर्वी कृषी पर्यवेक्षक यांनी राबविलेल्या घटकाची १०% तपासणी करावी. सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (प्रपत्र- ६) तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे. तपासणी अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा.

**उपविभागीय कृषि अधिकारी :-**

१. शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छानणी, ग्राम कृषी संजीवनी समितीची मान्यता व स्थळ तपासणी अहवाल विचारात घेवून अर्जाच्या पात्र / अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा व अपात्र असल्यास लाभार्थीस कारणासहित अवगत करावे.
२. अर्ज सादर केलेल्या पात्र शेतकऱ्यांस विहित नमुन्यात पूर्वसंमती द्यावी (प्रपत्र-३).
३. लाभार्थी शेतकऱ्याने अवगत केल्यानंतर कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक यांचेकडून तपासणी पूर्ण करून घ्यावी.
४. शेतकऱ्यास पूर्वसंमती देतांना पूर्वसंमती पत्रासोबत गांडूळ खत उत्पादन युनिट, नॅडेप कंपोस्ट उत्पादन युनिट व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उभारणी प्रक्रिया व देय अनुदान याबाबत अवगत करावे.
५. अनुदान प्रस्ताव, प्रथम (मोका) व अंतिम तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पासाठीचे कृषि पर्यवेक्षक यांनी अनुदान प्रस्ताव तपासून अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.
६. पात्र लाभार्थींना निधी उपलब्धतेनुसार DBT द्वारे ७ दिवसात अनुदान अदायगी करावी.
७. उपविभागांतर्गत राबविलेल्या घटकांपैकी २% लाभार्थ्यांची अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करावी.
८. योजनेचे सनियंत्रण करणे.

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी :-**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची आकस्मिक तपासणी करावी व विहित प्रपत्रात अहवाल सादर करावा.
३. उपविभागीय कृषि अधिकारी यांना आवश्यकतेनुसार निधी वितरण व सनियंत्रण करावे.

# प्रपत्र-१

## प्रकल्पांतर्गत लाभासाठी निवड होणेकरिता अर्ज व हमीपत्र

## जागतिक बँक अर्थसहाय्यित

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

(प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र अर्ज करावा)

**प्रति,**

**मा. अध्यक्ष, ग्राम कृषि संजीवनी समिती ........................... (अर्जदाराचे गाव) ..................................**

**गावसमूह क्रमांक....................................तालुका ................................. जिल्हा ................................**

**महोदय,**

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी, माझ्या मालकीहक्काचे शेत जमिनीमध्ये हवामान बदलास पुरक पध्दतीने शेती करण्यासाठी गुंतवणूक करणेस तयार आहे, त्याकरिता या प्रकल्पांतर्गत खालील घटकाचा लाभ मिळावा,ही विनंती.

**मागणी केलेल्या घटकाचे नाव-...............................................................**

**घटकाचा तपशील[1].-........................................................................**

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | अर्जदार शेतकऱ्यांचे संपूर्ण नाव | (आडनाव) (प्रथम नाव ) (वडीलाचे नाव )<br>....................... .............................. .......................... |
| २. | पूर्ण पत्ता | घर क्र. ............... गल्ली क्र./भागाचे नाव .....................<br>गाव............................... पोस्ट...................................<br>तालुका........................... जिल्हा..............................<br>पिन क्र.- ☐☐☐☐☐☐ |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांक-[2] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ४. | स्त्री/पुरुष(लागू असेल तेथे √ अशी खूण करावी) | स्त्री ☐ पुरुष ☐ |
| ५. | जात प्रवर्ग (लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | अ.जा. अ.ज. इतर |
| ६. | अर्जदार दिव्यांग आहे काय?( लागू तेथे √ खूण करावी) | होय ☐ नाही ☐ |
| ७. | दारिद्र्य रेषेखालील असल्यास - यादीतील अ.क्र[3]. | ☐☐☐☐☐☐☐☐ |
| ८. | आधारकार्ड क्र.[4] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |

---

[1] या मध्ये अनुदान मागणी केलेल्या घटकाचा तपशील उदा. शेततळ्याचा आकार, हरितगृहाचा/शेडनेटचा आकार, फळबाग लागवड असल्यास फळपिक नाव, क्षेत्र इ. तसेच ठिबक, तुषार असल्यास- पिकाचे नाव-क्षेत्र इ. तपशील नमूद करावा.

[2] प्रकल्पाच्या विविध घटकातील माहितीची देवाण-घेवाणीसाठी भ्रमणध्वनी क्रमांकाचा प्रकल्पाच्या कामकाजासाठी वापर करण्यास माझी सहमती आहे.

[3]दारिद्र्य रेषेखालील दाखला सोबत जोडण्याची आवश्यकता नाही. तथापि ग्राम कृषी संजीवनी समिती लाभार्थी निवड करतेवेळी अर्जदार दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबत खात्री करून अर्जाबाबत उचित निर्णय घेऊ शकेल.

| | | |
|---|---|---|
| ९. | स्वतःच्या नावावरील एकूण क्षेत्र (८-अ प्रमाणे) | खाते क्र........................... <br> एकूण जमिनधारणा [ ] (हेक्टर) [ ] (आर) |
| १०. | आरटीजीएस सुविधा असणाऱ्या बँकेचे नाव | |
| | खाते क्रमांक- | [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ] |
| | बँकेची शाखा- | |
| | आयएफएससी कोड- | [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ] |
| ११. | घेत असलेली पिके- | |
| १२. | ज्या क्षेत्रावर घटक राबविणार आहे त्या क्षेत्राचा सर्व्हे/गट क्रमांक- | क्षेत्र \| गाव \| तालुका |
| १३. | मागणी केलेल्या बाबींचा तपशिल | १. गांडुळ खत उत्पादन युनिट अथवा नॅडेप खत उत्पादन युनिट ------------ <br> २. सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट------------------- |
| १४. | यापूर्वी याच घटकाचा लाभ आपण अथवा आपल्या कुटुंबातील[५] अन्य सदस्यांनी या किंवा इतर योजनेतून घेतला आहे काय? असल्यास लाभ घेतलेली योजना,अनुदान रक्कम व लाभ घेतलेचे वर्षे इ.तपशील . | |
| १५. | मागणी केलेल्या घटकाचा एकूण अंदाजित खर्च. | रक्कम रुपये............................. |
| १६. | निकषानुसार अपेक्षित अनुदान | रक्कम रुपये............................. |
| १७. | अनुदान वजा जाता उवर्रित रक्कम कशा प्रकारे उभारणी करणार ? (लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | स्वत: [ ] बँक कर्जाव्दारे [ ] |

सदर घटकासाठी माझी निवड झाल्यास आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन विहीत मुदतीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच प्रकल्प आधिकाऱ्यांच्या तांत्रिक देखरेखीखाली काम पूर्ण करीन व त्यानंतरच मला अनुदान देय राहील .तसेच सदरचे काम मी विहित मुदतीत व मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पूर्ण न केलेस अनुदान मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

सदर बाबीचा लाभ घेत असताना वा त्यानंतर माझेकडुन गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अथवा लाभांकित बाबीचा माझ्याकडुन गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास संबधित घटकासाठी मिळालेले अनुदान माझ्याकडून सव्याज वसुल केले जाईल याची मला स्पष्ट जाणीव आहे.

प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तींना घटक तपासणीसाठी माझी संमती आहे तसेच, त्यांना या तपासणी कामासाठी सहकार्य करेन.

वरील सर्व माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

स्थळ:- (गावाचे नाव)............................

दिनांक- / / २०--

**अर्जदार शेतक-याची सही/अंगठा**

---

कोठेही जतन अथवा सामाईकीकरण )share (केली जाणार नसून ती फक्त सी आय डी आर) Central Identities Data Repository) कडे पडताळणी करता सादर केली जाईल.

कुटुंब या व्याख्येत पती, पत्नी व १८ वर्षाखालील मुलांचा समावेश राहील.

## प्रपत्र - २

(प्रकल्प स्थळ पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय-कृषि सहाय्यक)

श्री/ श्रीमती-------------------------------------------मु. पो.----------------- ता.----------- जि.------------------ यांनी त्यांचे मालकीचे स.नं./गट नं. -----------मधील एकूण क्षेत्र -------------(हे. आर.) पैकी -------------(हे. आर.) क्षेत्रावर नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत, गांडुळ खत उत्पादन युनिट/नॅडेप खत उत्पादन युनिट/सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट या घटकासाठी अर्ज केलेला आहे. सदर शेतकऱ्याकडे गांडुळ खत उत्पादन युनिट / नॅडेप खत उत्पादन युनिट /सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उभारणीकरिता योग्य जागा तसेच इतर आवश्यक बाबी जसे जनावरे, पिकांचे अवषेश इत्यादी उपलब्ध आहेत/नाहीत.

सदर अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दिनांक -------रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर/नामंजुर केलेला आहे. सदर लाभार्थी योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र आहे/नाही. दिनांक --------------- रोजी भेट देऊन प्रस्तावित प्रकल्प स्थळाची लाभार्थी समक्ष पाहणी केली असता घटकासाठी आवश्यक व योग्य क्षेत्र लाभार्थ्याकडे उपलब्ध असून/नसुन प्रकल्प राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे/नाही.

सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे/नाही.

**ठिकाण** **(स्वाक्षरी)**
**दिनांक** **कृषि सहाय्यक**

**नाव**
**ता.**
**जि.**

(टीप-कृषी सहाय्यक यांनी मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून उपरोक्त स्थळ तपासणी अहवाल भौगोलिक चिन्हांकनासह (Geo-tagging) द्यावा.)

## प्रपत्र -३

# पूर्वसंमती पत्र

(पुर्वसंमती पत्राचा नमूना)

जा.क्र. -----------------

कार्यालय- उपविभागीय कृषि अधिकारी, _____

उपविभाग ________, जिल्हा________

दिनांक - / /२०----

प्रति,

श्री/श्रीमती---------------------------------------------------मु.पो.------------------

तालूका ---------जिल्हा --------------

आपल्या दिनांक -------------- रोजीच्या अर्जाप्रमाणे, गांडुळ खत उत्पादन युनिट / नॅडेप खत उत्पादन युनिट/सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उपघटकासाठी आपली लाभार्थी म्हणून निवड करण्यात आली आहे. अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधिन राहून आपणांस (गांडुळ खत उत्पादन युनिट/नॅडेप खत उत्पादन युनिट/सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट) या बाबींच्या कामास प्रकल्पांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार अनुज्ञेय रकमेसाठी पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहुन पूर्वसंमती देण्यात येत आहे.

१. आपल्या पसंतीच्या बांधकाम व्यवसायिक/स्वत: /गवंडी कडुन गांडुळ खत उत्पादन युनिट/नॅडेप खत उत्पादन युनिट/सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उभारणी करण्यास आपणास मुभा आहे.
२. सदरचे पूर्वसंमती पत्र मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण गांडुळ खत उत्पादन युनिट अथवा नॅडेप खत उत्पादन युनिट/सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिटची उभारणी पूर्ण करणे बंधनकारक राहील अन्यथा सदर पूर्व संमती रद्द होईल याची नोंद घ्यावी.
३. सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर आपणास शासन निर्णयानुसार (मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड इत्यादी) अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धते नूसार मंजूर करण्यात येईल.
४. सदरचे अनुदान आपल्या राष्ट्रीयकृत बँकखात्यावर जमा करण्यात येईल.
५. आपल्या प्रकल्प प्रस्तावास मंजूरी देणे, देय अनुदानाची रक्कम/देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प/शासनाचा राहील.

**उपविभागीय कृषि अधिकारी,**

**उपविभाग_________**

**जिल्हा: __________**

**प्रत ,**

माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित ,

१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी------------
२) अध्यक्ष, ग्राम कृषी संजीवनी समिती-------------

# प्रपत्र -४
## (लाभार्थी अनुदान मागणी पत्र)

**प्रती,**
उपविभागीय कृषि अधिकारी,
उपविभाग _________
जिल्हा: _________

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत देय अनुदान मिळणेबाबत.**

मी श्री. / श्रीमती................................................................मु. .............पो. ............... ता............... जि.............. आपणास विनंती करतो की, मला मिळालेल्या -----------रोजीच्या पूर्व संमतीनुसार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत, गांडुळ खत उत्पादन युनिट/नॅडेप खत उत्पादन युनिट/सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिटच्या उभारणीचे काम आपण निर्गमित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण केले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे;

प्रकल्प उभारणी बाबतचा तपशिल

| अ.क्र. | घटक | आकारमान / निविष्ठा उत्पादन सामुग्री इ. बाबतचा तपशिल |
|---|---|---|
| अ. | गांडूळ खत उत्पादन युनिट / नाडेप कंपोस्ट उत्पादन युनिट | |
| ब. | सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट | |

सदर बाब संबधित कृषी सहाय्यक यांना अवगत केली आहे. तरी मला नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत गांडुळ खत उत्पादन युनिट/नॅडेप खत उत्पादन युनिट/सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट या घटकाच्या आर्थिक निकषानुसार देय अनुदान मिळावे. ही विनंती

**दिनांक :**

**लाभार्थीची स्वाक्षरी/अंगठा**

**(नाव व पत्यासह)**

# प्रपत्र -५
## मोका तपासणी अहवाल
(कृषि सहाय्यक यांनी करणे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | गावाचे नाव | |
| ३. | तालुका | |
| ४. | जिल्हा | |
| ५. | तपासणी दिनांक | |
| ६. | बाब | गांडुळ खत उत्पादन युनिट / नॅडेप खत उत्पादन युनिट / सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट |
| ७. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ८. | मंजूर असलेल्या प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ___ | क्षेत्र ----------हे. -----आर |
| ९. | बांधकाम व्यवसायिकाचे नाव | |
| १०. | विक्रेत्याचे नाव | |
| ११. | मंजूर बाबींचा तपशिल | १. गांडुळ खत उत्पादन युनिट / नॅडेप खत उत्पादन युनिट<br>(रु.) ------------<br>२. सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट<br>(रु.) ----------------- |
| १२. | उपलब्ध जनावरे (गाय, म्हैस, शेळी, मेंढी /इतर) | |
| १३. | अनुदानाची गणना: गांडुळ खत उत्पादन युनिट / नॅडेप खत उत्पादन युनिट / सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट याचा आर्थिक मापदंडा प्रमाणे रक्कम , अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>बाब- ----------------<br>तांत्रिक व आर्थिक मापदंड रक्कम - रु. --------------<br>अनुदान मर्यादा- रु. ---------------<br>मंजूर अनुदानाची रक्कम- रु. ------------<br>तपासणीनुसार देय होणारी रक्कम- रु. ----------- | |

गांडुळ खत उत्पादन युनिट /नॅडेप खत उत्पादन युनिट / सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट उभारणी तांत्रिक निकषानुसार आहे/नाही. या घटकांतर्गत उभारणी मार्गदर्शक सूचनेनुसार असून इतर बाबींतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे/नाही.

समक्ष-

**लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी /अंगठा** **स्वाक्षरी कृषि सहाय्यक**

**(श्री. )** **दिनांकीत स्वाक्षरी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

## प्रपत्र – ६
## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी: ___________<br>(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर)<br>__________<br>मु.पो. ___________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. ________ |
| ६. | बाब | गांडुळ खत उत्पादन युनिट / नॅडेप खत उत्पादन युनिट / सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ८. | उत्पादकाचे नाव | |
| ९. | वितरकाचे नाव | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ________<br>२. गांडुळ खत उत्पादन युनिट अथवा नॅडेप खत उत्पादन युनिट<br>३. सेंद्रिय निविष्ठा उत्पादन युनिट |
| ११. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. | |

| | | |
|---|---|---|
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १३. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १४. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १५. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

**तपासणी अधिकारी, श्री.**

**पदनाम.**

**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**

**पदनाम.**

**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**

**(नाव.............................)**